# संपादकीय

सौ. जयश्री खाडिलकर-पांडे
सादर करीत आहेत

# जाणत्या राजाचा तोल गेला?

महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांची जाहीर वक्तव्य हल्ली एकापेक्षा एक धक्कादायक ठरत आहेत. त्यांची वक्तव्य अशी होऊ लागली आहेत की, इतकी वर्षे ज्या नेत्याचे मार्गदर्शन आपण ऐकत होतो ते त्यांचे खरे विचार होते की आज त्यांनी बोललेले वाक्य हे त्यांचे खरे विचार आहेत, असा संभ्रम जनतेच्या मनात निर्माण होऊ लागला आहे. मात्र जे जवळून राजकारण बघत आले आहेत ते सांगतील की, राजकारणी आजवर जनतेसमोर उघडपणे न बोलता जी वक्तव्ये करायचे ती वक्तव्ये आता जाहीर सभेत मांडण्याचे धाडस राजकारण्यांत आले आहे. शेवटच्या पंधरा दिवसांत आपण मते खिशात टाकू शकतो याचा त्यांना इतका आत्मविश्वास चढला आहे की, त्यांना जनतेची भीतीच राहिलेली नाही.

ऊस शेतकऱ्यांच्या आंदोलनात नेते ज्याप्रमाणे वागत आहेत त्यातून त्यांना कुणाची पर्वा राहिलेली नाही, हेच दिसत आहे. अजित पवार स्वत:ला टग्या म्हणून घेऊन धन्य झाले. सुशीलकुमार शिंदे त्यावर एक मजला चढवत म्हणाले की, घोटाळा करायचा, हात धुवायचे, पुन्हा घोटाळा करायचा. जनता सगळे विसरते.

राजकीय नेत्यांचे हे वैचारिक धक्के जनता सहन करीत असतानाच महाराष्ट्राचा 'जाणता राजा' शरद पवार यांनी कळस चढविला. शरद पवार यांनी आपल्या भाषणात खासदार राजू शेट्टी यांच्याबद्दल जे वक्तव्य केले ते अतिशय धक्कादायक आहे. निवडणुकीच्या प्रचारात खालच्या पातळीवर होणारे आरोप प्रत्यारोप नवीन नाहीत, पण शरद पवारांसारख्या दिग्गज नेत्याने जे शब्द वापरले त्याने जनताच अवाक् झाली. खासदार राजू शेट्टी काम असले की माझ्याकडे येतात, तुझे दुकान सुरू ठेवून दुसऱ्याचे दुकान बंद करायला निघालाय, अशी वक्तव्य करीत त्यांनी राजू शेट्टीचा अरे तुरेच्या भाषेत उल्लेख केला. सहकाराचे 'दुकान' झाले आहे हे शरद पवारच बोलले हे ठीक आहे. आता त्यांच्या सहकाराच्या दुकानासाठी शेतकऱ्यांनी लढावे का? शरद पवारांकडून अशी भाषा अपेक्षित नव्हती, अशी भाषा वापरणे अत्यंत निंदनीय आहे.

सर्वात गंभीर आणि सर्वात धोकादायक असे शरद पवारांचे वक्तव्य म्हणजे त्यांनी जातीचा उल्लेख केला. राजू शेट्टींची जात आणि वारणा कारखानदारांची जात एक आहे म्हणून वारणा कारखाना सुरू आहे, असे अत्यंत विषारी वक्तव्य शरद पवारांनी केले. राजू शेट्टींचे आंदोलन मोडून शेतकऱ्यांत फूट पाडण्यासाठी शरद पवारांनी जातीचे कार्ड वापरले आणि तेही जाहीरपणे वापरले. पुरोगामी आणि जाणता राजा अशी ओळख असलेल्या शरद पवारांच्या मनात महाराष्ट्राला जातीयवादाच्या अंधारात लोटणारे विचार येतात याहून वाईट खरोखरच काही नाही. शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्राचा जाणता राजा जेव्हा जातीचे कार्ड वापरतो तेव्हा त्यांचा तोल गेला इतकाच अर्थ त्यातून काढायचा की जातीचे राजकारण आता शीगेला नेले जाणार आहे हे समजून घ्यायचे?

महाराष्ट्राच्या नेत्यांचा आणखी तोल जाऊ नये यासाठी एकच घडायला हवे आहे. जनतेने पेटून आंदोलन केले पाहिजे. सरकारने काहीही करावे, जनता शांत आहे, अशीच स्थिती राहिली तर मग तोल गेलेल्या नेत्यांची टगेगिरी सहन करावी लागेल आणि त्याचा शेवट महाराष्ट्राच्या अधोगतीत होईल.